# पोलीस अधिक्षक बुलढाणा यांचे संकल्पनेतुन F.I.R. ऑन द स्पॉट उपक्रम सुरू.

१) पोलीस स्टेशनला मोबाईल किंवा गोपनीय माहीती दवारे दखलपात्र अपराध घडल्याची माहीती मिळाली असता लागलीच अधिकारी व कर्मचारी व डी.बी. पथकासह घटनास्थळी संगणक, लॅपटॉपसह सरकारी वाहनाने घटनास्थळी पोहचतील.

२) दखल पात्र अपराध घडल्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी जावुन तक्रारदार यांच्या तक्रारी नुसार संगणकावर तक्रार नोंदवुन घेतील.

३) तक्रारदार यांची संगणकावर नोंदविलेल्या तक्रारीची प्रिन्ट काढुन त्यावर तक्रारदार याची सही जागीच घेतील व तक्रारदार यांनी दिलेली तक्राराची प्रत ही संगणका मधील स्कॅनरद्वारे पोलीस स्टेशनच्या ईमेल वर पाठवतील.

४) पोलीसठाणे अंमलदार हे पोलीस स्टेशनच्या ई मेल वरील आलेल्या तक्रारीची प्रिन्ट काढुन लागलीच पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करतील.

५) पोलीस ठाणे अंमलदार हे घटनास्थळा वरील अधिकारी व कर्मचारी यांना गुन्हा नोंद झालेबाबत मोबाईलद्वारे माहीती देतील.

६) दाखल दखलपात्र अपराधाच्या अनुषंगाने कायदेशिर तपास करतील उदा. घटनास्थळ पंचनामा, जवाब नोंदविणे, जप्ती कारवाई इत्यादी करतील

७) घटनास्थळा वरील इतर डी. बी. पथकातील अधिकारी व कर्मचारी हे गुन्हात गेले मुद्देमालाचा व आरोपीचा शोध घेतील.

८) डी. बी. पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पकडलेला आरोपी यांना पोलीस स्टेशनला पकडुन आणतील त्यांच्यावर रितसर अटक कारवाई करतील.

९) सदर आरोपी याचे ताब्यातुन गुन्हातील उदा. गेले माल, गुन्हातील जप्त हत्यार गुन्हातील तपास पुरकचिज वस्तु जप्त करतील.

१०) सदर गुन्हातील गेलेला मुद्देमाल मिळुत आल्यास तक्रारदार यांना कायदेशिररित्या परत करतील.

११) अशा पदधतीने तक्रारदार याची घटनास्थळावर तात्काळ तक्रार नोंदवुन त्याचा तपास करुन तक्रारदार याचे जीवनमान सुकर होईल.

१२) अशा पद्धतीने बुलढाणा जिल्ह्यात १० पोलीस स्टेशन मध्ये सदरची On The Spot F.I.R. संकल्पना सुरू करण्यात आली आहे.